# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

**(formerly University of Pune)**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ४०(२)(क)|40(2)(a)|, ४०(२)(घ)(दोन)|40(2)(d)(ii)| आणि ४०(२)(घ)(तीन)(क),(ख),(ग),(घ)|40(2)(d)(iii)(A)(B)(C)(D)| नुसार विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेमध्ये समाविष्ट असलेल्या अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून स्वीकृतीबाबत..

## जाहीर प्रकटन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम १२(८) नुसार मा. कुलगुरु यांनी त्यांच्या अधिकारात पारित केलेला आदेश क्रमांक २१२/२०१७, संदर्भ क्रमांक सीबीएस/६५६, दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ अन्वये विहित करण्यात आलेल्या प्रत्येक विषयासाठी किंवा विषयांच्या गटासाठी तयार करण्यात आलेल्या अभ्यास मंडळांवर, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, दिनांक २८ एप्रिल, २०१७ मधील अनुसूची-दोन अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्याच्या अथवा स्वीकृत करुन घेण्यासाठी विनिर्दिष्ट केलेल्या पात्रता शर्ती नुसार, प्रत्येक विषयासाठी किंवा विषयांच्या गटासाठी प्रत्येक अभ्यास मंडळासाठी एकूण पाच सदस्यांना स्वीकृत करावयाचे आहे. तसेच ज्या विषयासंबंधीत विद्यापीठात विभाग नसेल त्याबाबतीत त्या विषयातील पदव्युत्तर स्तरावर अध्यापन करणाऱ्या संलग्न महाविद्यालयांमधील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेमधील पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी मान्यता मिळालेली आहे, अशा विभागाच्या प्रमुखास स्वीकृत करावयाचे आहे.

१) कलम ४०(२)(क) ज्या विषयासंबंधीत विद्यापीठात विभाग नसेल त्याबाबतीत त्या विषयातील पदव्युत्तर स्तरावर अध्यापन करणाऱ्या संलग्न महाविद्यालयांमधील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेमधील पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी मान्यता मिळालेली आहे, असा विभागप्रमुख;

२) कलम ४०(२)(घ)(दोन) इतर विद्यापीठातील एक प्राध्यापक;

३) कलम ४०(२)(घ)(तीन)(क) राष्ट्रीय प्रयोगशाळा किंवा परिसंस्थांतील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा उद्योग यांमधील सहायक संचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसलेले पद धारण करणारी व्यक्ती किंवा मान्यताप्राप्त राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये त्या विषयातील किमान एक संदर्भ पुस्तक किंवा तीन संशोधन प्रबंध प्रसिद्ध झाले आहेत अशा संबंधित क्षेत्रामधील तज्ज्ञ व्यक्ती;

४) कलम ४०(२)(घ)(तीन)(ख) संबंधित विषयातील नामवंत विद्याव्यासंगी व्यक्ती;

५) कलम ४०(२)(घ)(तीन)(ग) विषयाशी संबंधित उद्योगामधील किंवा व्यावसायिक संस्थांमधील नामवंत व्यक्ती;

६) कलम ४०(२)(घ)(तीन)(घ) विषयाशी संबंधित उद्योगामध्ये किमान दहा वर्षे कामाचा अनुभव किंवा विषयाशी संबंधित उद्योगाचा मालक किंवा सल्लागार किंवा संयंत्रणा याचा अनुभव असणारी व्यक्ती.

अभ्यास मंडळाच्या पहिल्या बैठकीत वरील तरतुदीनुसार स्वीकृती करण्यात आली.

**विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेमध्ये समाविष्ट असलेल्या** प्रत्येक विषयासाठी किंवा विषयांच्या गटासाठी असलेल्या अभ्यास मंडळाने त्यांच्या पहिल्या बैठकीत खालीलप्रमाणे सदस्यांची स्वीकृती केली आहे :

| अभ्यास मंडळाचे नाव | म.सा.वि.अ.,२०१६ मधील कलम | नामनिर्देशित सदस्याचे नाव व पत्ता |
|---|---|---|
| इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी | ४०(२)(क) | डॉ. गुंजाळ बैसा,<br>'संदेश' वेताळनाथ डेअरी, वेल्हाळे रोड, मु. गुंजाळवाडी,<br>पो. राजापूर, ता. संगमनेर, जि. अहमदनगर – ४२२६०५ |
| | ४०(२)(घ)(दोन) | डॉ. खेडकर उदय,<br>डिपार्टमेंट ऑफ कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग,<br>आय.आय.टी. मुंबई, पवई, मुंबई – ४०००७६ |
| | ४०(२)(घ)(तीन)(क) | डॉ. कुलकर्णी विवेक,<br>पर्सिस्टंट सिस्टिम लिमिटेड, पर्सिस्टंट लॅब,<br>काशीबाई खिलारे पथ, एरंडवणे, पुणे – ४११००४ |
| | ४०(२)(घ)(तीन)(ख) | डॉ. गर्जे गोरक्ष,<br>गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक कॉलेज, वीर सावरकर मार्ग,<br>नांदेड - ४३१६०३ |
| | ४०(२)(घ)(तीन)(ग) | डॉ. विचारे अभिजात,<br>सी ३/७०१, कुमार परिसर सोसायटी, गांधीभवनजवळ,<br>कोथरुड, पुणे – ४११०३८ |
| | ४०(२)(घ)(तीन)(घ) | श्री. कदम संजय,<br>सी-डॅक, पुणे विद्यापीठ कॅम्पस, गणेशखिंड रोड,<br>पुणे – ४११००७ |

अभ्यास मंडळासमोर नमूद केलेले प्राध्यापक, तज्ज्ञ व्यक्ती, नामवंत विद्याव्यासंगी व्यक्ती, उद्योगांमधील किंवा व्यावसायिक संस्थांमधील नामवंत व्यक्ती, उद्योगामध्ये किमान दहा वर्षे कामाचा अनुभव किंवा विषयाशी संबंधित उद्योगाचा मालक किंवा सल्लागार किंवा संयत्रणा याचा अनुभव असणारी व्यक्ती यांना संबंधित अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून स्वीकृत करुन घेण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ४०(२)(क)[40(2)(a)], ४०(२)(घ)(दोन)[40(2)(d)(ii)] आणि ४०(२)(घ)(तीन)(क),(ख),(ग),(घ)[40(2)(d)(iii)(A)(B)(C)(D)] नुसार सर्व संबंधित व्यक्तीच्या स्वीकृत सदस्यत्वाची मुदत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ६२ मधील तरतुदीनुसार दिनांक ३१ ऑगस्ट, २०२२ पर्यंत राहील व कलम ६३ आणि ६४ मधील तरतूद अथवा महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या आदेशास अनुसरुन यापैकी जे अगोदर घडेल त्या तारखेस संपुष्टात येईल, सर्व संबंधितांनी याची कृपया नोंद घ्यावी.

अभ्यास मंडळावर स्वीकृत झालेल्या सर्व सदस्यांचे वैयक्तिक माझ्यातर्फे व विद्यापीठातर्फे अभिनंदन.

संदर्भ क्र. : साफुपुविनि/०७
दिनांक : ०३/०१/२०१९

(डॉ. प्रफुल्ल अ. पवार)
कुलसचिव

<u>प्रत</u> : सर्व संबंधित सदस्य.

प्रत माहितीसाठी :

१) मा. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
२) उपकुलसचिव, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
३) उपकुलसचिव, सभा व दप्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
४) सहायक कुलसचिव, मा. कुलगुरु कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
५) सहायक कुलसचिव, मा. प्र-कुलगुरु कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.